30 AUG 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खाशाबांचा आदर्श घेऊन खेळाडूंनी वाटचाल करावी

## रणजित जाधव; विद्यापीठात खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्याला समर्पित प्रदर्शनास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जाज्ज्वल्य देशप्रेम, उत्तुंग इच्छाशक्ती व उच्च नैतिकमूल्यांची जोपासना या त्रिसूत्रीची जोपासना करीत देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांनी आयुष्य व्यतित केले. उदयोन्मुख क्रीडापटूंनी त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करावी, असे आवाहन त्यांचे सुपुत्र रणजित जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्याला समर्पित दोनदिवसीय प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

जाधव म्हणाले, भारताने ऑलिम्पिकमध्ये केवळ ४८ पदके मिळविली असून, त्यात वैयक्तिक पदके २३ आहेत. ही खूप मोठी पोकळी आहे. व्यवस्थाप्रणित त्रुटी असल्या, तरी खेळाडूंनी पूर्ण ध्येयनिष्ठेने व नितिमानतेने नैपुण्याचा कस लावून पदके मिळविण्यासाठी सज्ज व्हायला हवे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्यावर आधरित प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रणजित खाशाबा जाधव. सोबत मान्यवर.**

### दुर्मीळ आठवणींचा पट उलगडला

प्रदर्शनात खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धांसह विविध स्पर्धांत जिंकलेली पदके, चषके, स्मृतिचिन्हे, ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये घातलेला ब्लेझर व पोषाख, पोलिस सेवेतील कॅप्स, वेपन, हॉकी स्टीक, दुर्मीळ छायाचित्रे, हस्तलिखित पत्रे, त्यांच्याविषयी प्रसिद्ध झालेले लेख, बातम्या आहेत. जाधव कुटुंबीयांनी प्रथमच अशा प्रकारे खाशाबा जाधव यांच्याशी निगडित अमूल्य व दुर्मीळ वस्तूंचा संग्रह नागरिकांना पाहण्यासाठी खुला केला आहे. प्रदर्शन पाहण्यासाठी शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींची गर्दी होत आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, खाशाबा जाधव यांच्या कुटुंबीयांनी प्रदर्शन भरविण्याच्या अनुषंगाने विद्यापीठावर विश्वास टाकला ही मोठी बाब आहे. दुर्मीळ दस्तावेजांचे डिजिटायझेशन वगैरे प्रकारे जतन व संवर्धन करण्याच्या कामी विद्यापीठ सहकार्यासाठी सदैव तत्पर राहील.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सुचय खोपडे यांच्यासह क्रीडा अधिविभागाच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

30 AUG 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खाशाबा जाधव यांच्या आठवणींचा संग्रह उलगडला

## शिवाजी विद्यापीठात प्रदर्शनाला प्रारंभ; शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची गर्दी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आज राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त ऑलिंपिकपदक विजेते खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्याला समर्पित दोन दिवसीय प्रदर्शनाला प्रारंभ झाला. त्यातून जाधव यांच्या दुर्मीळ आठवणींचा संग्रह उलगडला आहे.

विद्यापीठाच्या कुस्ती संकुलातील या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, खाशाबा जाधव यांचे चिरंजीव रणजित जाधव प्रमुख उपस्थित होते. प्रदर्शनात खाशाबा जाधव यांनी ऑलिंपिक व आशियाई स्पर्धांसह विविध स्पर्धांत जिंकलेली पदके, चषके, स्मृतिचिन्हे, ऑलिंपिक स्पर्धेत घातलेला ब्लेझर व पोषाख, पोलिस सेवेतील कॅप्स, वेपन, हॉकी स्टीक, दुर्मीळ छायाचित्रे, हस्तलिखित पत्रे, त्यांच्याविषयी प्रसिद्ध झालेले लेख, बातम्या आदी बाबी मांडण्यात आल्या आहेत. जाधव कुटुंबीयांनी प्रथमच अशा प्रकारे खाशाबा जाधव यांच्याशी निगडित अमूल्य व दुर्मीळ वस्तूंचा संग्रह नागरिकांना पाहण्यासाठी खुला केला आहे. प्रदर्शन पाहण्यासाठी शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गर्दी केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रदर्शनामध्ये खाशाबा जाधव यांनी ऑलिंपिकमध्ये परिधान केलेला पोषाख पाहताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, रणजित जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

दरम्यान, जाज्वल्य देशप्रेम, उत्तुंग इच्छाशक्ती आणि उच्च नैतिक मूल्यांची जोपासना या त्रिसूत्रीची जोपासना करीत देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक विजेते खाशाबा जाधव यांनी आयुष्य व्यतित केले. उदयोन्मुख क्रीडापटूंनी त्यांचा हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करावी, असे आवाहन रणजित जाधव यांनी केले.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, प्रकाश गायकवाड, तानाजी चौगुले, रामचंद्र पवार, दौलत इंगवले, बाजीराव जाधव, प्रियांका जाधव, राजेंद्र रायकर, सुधा खोपडे उपस्थित होते. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### दस्तावेजांच्या डिजिटायझेशनसाठी विद्यापीठ तत्पर

खाशाबा जाधव यांच्या कुटुंबीयांनी प्रदर्शन भविष्यकाळाच्या अनुषंगाने विद्यापीठावर विश्वास टाकला, ही मोठी बाब आहे. या दुर्मीळ दस्तावेजांचे डिजिटायझेशनच्या रूपाने जतन व संवर्धन करण्याच्या कामी विद्यापीठ सहकार्यांसाठी सदैव तत्पर राहील. विद्यापीठाच्या प्रत्येक खेळाडूने आपापले लक्ष्य निर्धारित करून त्याचा हिरिरीने पाठपुरावा करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
30 AUG 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खाशाबा जाधव यांचा आदर्श घेऊन वाटचाल करा

**रणजित जाधव ; शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय प्रदर्शन**



**कोल्हापूर :** जाज्वल्य देशप्रेम, उत्तुंग इच्छाशक्ती आणि उच्च नैतिक मूल्यांची जोपासना या त्रिसूत्रीची जोपासना करत देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांनी आयुष्य व्यतित केले. उदयोन्मुख क्रीडापटूंनी त्यांचा हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करावी, असे आवाहन त्यांचे सुपुत्र रणजित जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्याला समर्पित दोनदिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

जाधव म्हणाले, ऑलिम्पिक स्पर्धांच्या १२८ वर्षांच्या इतिहासात चीनने ७०० हून अधिक, अमेरिकेने १३०० हून अधिक पदके मिळविली आहेत; मात्र भारताने या काळात ४८ पदके मिळवली असून, त्यातही वैयक्तिक पदके अवघी २३ आहेत. ही खूप मोठी पोकळी आहे. व्यवस्थाप्रणित काही त्रुटी असल्या तरी खेळाडूंनी ध्येयनिष्ठेने आणि नैपुण्याचा कस लावून पदके मिळवण्यासाठी सज्ज व्हायला हवे. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, खाशाबा जाधव यांच्या कुटुंबीयांनी हे प्रदर्शन भरवण्याच्या अनुषंगाने विद्यापीठावर विश्वास टाकला, ही मोठी बाब आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परूळेकर, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, दौलत इंगवले, शामराव जाधव, प्रियांका जाधव, डॉ. राजेंद्र रायकर, सुचय खोपडे आदी उपस्थित होते. डॉ. शरद बनसोडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रा. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद आणि खाशाबा जाधव यांच्या प्रतिमांना अभिवादन केले.

**दुर्मीळ आठवणींचा संग्रह**

या प्रदर्शनात खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धांसह विविध स्पर्धांत जिंकलेली पदके, चषके, स्मृतिचिन्हे, ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये घातलेला ब्लेझर व पोशाख, पोलीस सेवेतील कॅप्स, वेपन, हॉकी स्टिक, दुर्मीळ छायाचित्रे, हस्तलिखित पत्रे, त्यांच्याविषयीचे लेख, बातम्या इत्यादी बाबी मांडल्या आहेत.

30 AUG 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘खाशाबां’च्या जीवनकार्याला उजाळा

## शिवाजी विद्यापीठात प्रदर्शन : क्रीडा अधिविभागाच्यावतीने आयोजन, विद्यार्थ्यांची मोठी गर्दी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धांसह विविध स्पर्धांत जिंकलेली पदके, चषके, स्मृतिचिन्हे, ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये घातलेला ब्लेझर, पोषाख, पोलिस सेवेतील कॅप्स, वेपन, हॉकी स्टीक, दुर्मीळ छायाचित्रे, हस्तलिखित पत्रे, त्यांच्याविषयी प्रसिद्ध झालेले लेख अन् बातम्यांमधून देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांचे जीवनकार्य गुरुवारी उलगडले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाच्या वतीने खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्याला समर्पित दोन दिवसीय प्रदर्शनाचे.





१) शिवाजी विद्यापीठात खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रदर्शन पाहण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. २) शिवाजी विद्यापीठात खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रदर्शनात दुर्मीळ वस्तू व दस्तावेज मांडण्यात आला आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन खाशाबा यांचे सुपुत्र रणजित जाधव यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते. जाधव म्हणाले, जाज्वल्य देशप्रेम, उत्तुंग इच्छाशक्ती आणि उच्च नैतिक मूल्यांची जोपासना या त्रिसूत्रीची जोपासना करीत देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांनी आयुष्य व्यतीत केले. उदयोन्मुख क्रीडापटूंनी त्यांचा हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करावी.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, विद्यार्थी विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### खाशाबा जाधव यांच्या दुर्मीळ आठवणींचा संग्रह

या प्रदर्शनात खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धांसह विविध स्पर्धांत जिंकलेली पदके, चषके, स्मृतिचिन्हे, ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये घातलेला ब्लेझर व पोषाख, पोलिस सेवेतील कॅप्स, वेपन, हॉकी स्टीक, दुर्मीळ छायाचित्रे, हस्तलिखित पत्रे अशा अमूल्य व दुर्मीळ वस्तूंचा संग्रह नागरिकांना पाहण्यासाठी खुला केला आहे. प्रदर्शन पाहण्यासाठी शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठी गर्दी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2024
सकाळ



कोल्हापूर : विद्यापीठात गुरुवारी 'राजर्षी शाहू छत्रपती विचारवेध' या ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. अशोक चौसाळकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अरुण भोसले, डॉ. अवनीश पाटील.

# राजर्षींच्या स्वप्नातील मराठी मुलूख अस्तित्वात आणावा : डॉ. भोसले

## 'राजर्षी शाहू छत्रपती विचारवेध'चे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २९ : सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्याद्वारे त्यांना पुरोगामी सामाजिक बदल अपेक्षित होते. तथापि, शाहू महाराजांच्या विचारांशी आपण नाते जपले आहे का, ते नाते विसरण्याचा द्रोह कोणी केला, या प्रश्नांची उत्तरे शोधून महाराजांच्या स्वप्नातील मराठी मुलूख अस्तित्वात आणण्याची जबाबदारी समाजाने घ्यावी, असे आवाहन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अरुण भोसले यांनी आज येथे केले.

राजर्षी शाहू छत्रपती शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, समाज प्रबोधन पत्रिका आणि इतिहास परिषदेतर्फे आयोजित डॉ. अवनीश पाटील संपादित 'राजर्षी शाहू छत्रपती विचारवेध' या ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर प्रमुख उपस्थित होते.

शाहू महाराजांच्या कार्यामागील त्यांच्या विचारांचा वेध घेणारा महत्त्वाचा ग्रंथ त्यातून साकारला आहे. महाराजांच्या विचारकार्यामधील सर्जनशीलता, प्रयोगशीलता, अभिनव उपक्रमशीलता, गतिमानता या गुणविशेषांचा अभ्यास करून त्यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याची गरज असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराजांच्या संदर्भातील पुनरुज्जीवन घडून आले, असे डॉ. चौसाळकर यांनी सुचविले. डॉ. टी. एस. पाटील, भारती पाटील, केशव हरेल, ईस्माईल पठाण, नंदकुमार मोरे, शिवाजी जाधव, आदी उपस्थित होते. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 AUG 2024
लोकमत



राजाराम महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा प्राचार्य डॉ. अनिता बोडके यांनी सत्कार केला. यावेळी डॉ. लता जाधव, प्रा. डॉ. अतुला पाटील, डॉ. अश्विनी साळुंखे, उपस्थित होत्या.

# उपलब्ध संसाधनांचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करा

## शिंदे : राजाराम महाविद्यालयात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : उपलब्ध संसाधनांचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मंगळवारी केले. राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त राजाराम महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागामार्फत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. अनिता बोडके अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. शिंदे म्हणाले, औद्योगिक व वैज्ञानिक प्रगती करत असताना त्याचे उद्दिष्ट हे मानवी जीवन सुखकर करणे असून, ते करताना नैसर्गिक जैवविविधतेला धक्का पोहोचणार नाही, याची काळजी घ्या. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना पारंपरिक ज्ञानाचाही आढावा घेतला गेला पाहिजे. देशाची वैचारिक संपत्ती जपून व त्याला विज्ञानाची जोड देऊन देशाला वैश्विक महासत्ता बनवणे हेच ध्येय असले पाहिजे. पण हे सर्व करताना सध्या होत असलेल्या जैविक खनिजांचा ऱ्हास आटोक्यात आणायला हवा. भौतिकशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. लता जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. डॉ. अतुला पाटील, डॉ. अश्विनी साळुंखे उपस्थित होते. अनुप कारेकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2024
पुण्यनगरी

# दुहेरी पदवी मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था डाएट यांच्या संयुक्त विद्यमाने दुहेरी पदवी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) प्राचार्य डॉ. राजेंद्र भोई होते. यावेळी संचालक डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक उमेश कोरे यांनी, सूत्रसंचालन डॉ. सुरेश चौगले यांनी केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2024
पुढारी

# पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेशासाठी ५ सप्टेंबरपर्यंत मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग, 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर कोऑपरेशन अँड लँग्वेज', लिस्बन, पोर्तुगाल या दोन संस्थांतील सामंजस्य करारातंर्गत पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सप्टेंबरमध्ये सुरू होत आहे. त्याअनुषंगाने ५ सप्टेंबरपर्यंत प्रवेशाची मुदत आहे.

कोर्ससाठी प्रवेश पात्रता बारावी उत्तीर्ण अशी आहे. विद्यार्थ्यांना ट्रान्स्फर वा मायग्रेशन प्रमाणपत्राची गरज लागत नाही. पोर्तुगीज भाषा इतर अभ्यासक्रम, नोकरी करत शिकता येते. महाराष्ट्रात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम असणारे शिवाजी विद्यापीठ एकमेव आहे. अभ्यासक्रमाचा महाविद्यालये, विद्यापीठ, विद्याशाखांत इतर अभ्यासक्रम करणारे विद्यार्थी, इतिहास विषयाचे विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, अभ्यासक, व्यापार क्षेत्रातील व्यक्ती घेऊ शकतात. माहितीसाठी विदेशी भाषा विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2024
सकाळ

# ज्ञानाच्या कक्षा उंचावण्यासाठी दुहेरी पदवी महत्त्वाची

## प्रा. के. बी. पाटील; दूरशिक्षण केंद्रातर्फे मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. २९ : 'विद्यार्थ्याला शिक्षण घेत असताना ज्ञानाच्या कक्षा उंचावण्यासाठी दुहेरी पदवी महत्त्वाची आहे', असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे समन्वयक प्रा. के. बी. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि सांगली येथील पुतळाबेन शहा कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्यातर्फे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकांसाठी आयोजित दुहेरी पदवी विशेष व ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. पी. मरजे होते.

डॉ. पाटील म्हणाले, 'कोणत्याही अभ्यासक्रमासाठी प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्याला दुहेरी पदवीसाठी पात्र होता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दुहेरी पदवीचा लाभ घ्यावा. एकाच वेळी दोन पदवी, पदव्युत्तर व डिप्लोमा करता येणार आहे. एक नियमित व एक दूरशिक्षण पद्धतीने पदवी पूर्ण करता येते.'

प्राचार्य डॉ. बी. पी. मिरजे म्हणाले, 'विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांनी दुहेरी पदवीचा लाभ घ्यावा.' याप्रसंगी प्रा. मुफिद मुजावर यांनी दुहेरी पदवी अर्जाबाबत सादरीकरण केले. यावेळी दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डी. के. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. बी. शिंदे, आदी उपस्थित होते. डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले. प्रकाश बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

30 AUG 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भवताल


डॉ. रसिया पडळकर

**इतिहासात अनेकदा हे दिसून आलेले आहे की, निसर्ग संसाधनांना वाचवण्याची जेव्हा वेळ येते त्यावेळी महिलांनी दाखवलेले धैर्य अतुलनीय असे असते. चिवटपणे व्यवस्थेशी टक्कर देतात, जीव पणाला लावतात.**

# आपण जागे कधी होणार..?

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा, नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा, अंजन, कांचन, करवंदीच्या काटेरी देशा, बकुळ फुलांच्या, प्राजक्तीच्या दळदारी देशा.

गडकरी यांनी केलेले हे महाराष्ट्राचे सुरेख वर्णन. थोड्याबहुत फरकाने अखंड भारत देश हा अशाच विविधतेने नटलेला आणि भौगोलिक वैविध्याने शृंगारलेला आहे. पश्चिम तटावर उभा असणारा कणखर सह्याद्री, तर ईशान्येची तटबंदी व्यापून, आकाशाला गवसणी घालणारी हिमालयाची हिमशिखरे. सह्याद्रीच्या अरण्यात वसलेल्या वृक्ष-वेलींच्या हजारो प्रजाती आणि तीन बाजूंनी पहुडलेले किनारे. राजस्थानातील मरुभूमी आणि केरळमधील ओलेचिंब पावसाळे... प्रत्येक ठिकाणी बहरलेली वेगवेगळी निसर्ग वैशिष्ट्ये. भारताच्या या समृद्ध नैसर्गिक विविधतेने भारतीय संस्कृतीला देखील असेच वैविध्यपूर्ण बनवले आहे. खान-पान-पोशाख, सण-वार या सर्व जीवनव्यवहारात निसर्गाच्या अस्तित्वाचे प्रतिबिंब उतरलेले असते. प्रत्येक ठिकाणी स्थानिक निसर्गासोबतचा अत्यंत जैविक व्यवहार मानवी संस्कृतीच्या जाणीव-नेणिवेत रुजलेला असतो. या व्यवहारातून निर्माण झालेल्या निसर्गासोबतच्या सहज अशा नात्यावर जेव्हा कसोटीची वेळ येते तेव्हा स्थानिक लोक या निसर्गाशी प्रामाणिक राहून कसा लढा देतात आणि अशावेळी राजेशाही सत्ता ते अगदी लोकशाही व्यवस्थांचा व्यवहार कसा असतो, याची अनेक उदाहरणे आपल्याकडे आहेत. राजस्थानमधील बिष्णोई समुदायाचे 'चिपको आंदोलन' ही त्याचीच कथा.



साधारण तीनशे वर्षांपूर्वी, सतराशे तीसमध्ये राजस्थानमधील मारवाड भागात, राजा अभयसिंगने आपल्या राजवाड्याचे बांधकाम काढले. अर्थातच बांधकामासाठी लाकूड लागणार होते. राजाचे सैनिक लाकूडतोडीसाठी जवळच्या खेजर्ली गावाच्या जंगलात गेले आणि त्यांनी वृक्षतोड सुरू केली. या जंगलात खेजरी वृक्ष बहुसंख्य होते. खेजरी, वाळवंटातील एक असा वृक्ष जो, अनेक जनावरांचे अन्न आहे. शिवाय याची फळे शिजवून खाता येतात आणि सालीचा वापर औषधी म्हणून होतो. असे हे बहुगुणी झाड, राजस्थानमधील बिष्णोई समुदायाचे श्रद्धास्थान आणि आस्थेचा वृक्ष. राजाच्या शिपायांनी या झाडावरच कुऱ्हाड चालवायला सुरवात केली. बिष्णोई समुदायातील स्त्रिया-पुरुष या झाडांना वाचवण्यासाठी पुढे सरसावले. यात प्रामुख्याने पुढे होत्या त्या महिला आणि त्यांचं नेतृत्व करणारी अमृता देवी. राजाच्या शिपायांपासून झाडांना वाचवण्यासाठी महिलांनी या झाडांना मिठ्या मारल्या. शिपाई बधले नाहीत . आणि त्यांनी महिला आंदोलकांसहित झाडांची कत्तल केली. ३६३ महिलांची यादरम्यान हत्या करण्यात आली आणि एका रक्तरंजित अध्यायाने भारतातील पर्यावरण रक्षणाच्या इतिहासाचे पान लिहिले गेले. पुढे राजाला ही बातमी कळताच त्याने ताबडतोब वृक्षतोड थांबवली आणि गावकऱ्यांची माफी मागितली; पण तोवर अनेक महिलांनी आपले प्राण या झाडांच्या चरणी अर्पण केले होते.

इतिहासात अनेकदा हे दिसून आलेले आहे की, निसर्ग संसाधनांना वाचवण्याची जेव्हा वेळ येते त्यावेळी महिलांनी दाखवलेले धैर्य अतुलनीय असे असते. बिष्णोई समुदायातील महिलांपासून, भारतातील मेधा पाटकर, सुनीता नारायण, वंदना शिवा, थिमाक्का, केनियातील वंगारी मथाई, अमेरिकेतील एरिन ब्रोकोविच ते अगदी स्वीडनमधील लहानग्या ग्रेटा थनबर्गपर्यंतची यादी मोठी आहे. लढणाऱ्या या महिला चिवटपणे व्यवस्थेशी टक्कर देत राहतात आणि आपल्या परिसराचे, भवतालचे रक्षण करण्यासाठी जीव पणाला लावतात.

दुसरीकडे व्यवस्था आणि व्यवस्थेचे पित्ते मात्र निर्दयीपणे जंगल, डोंगर, नद्या, प्राणी-पक्षी, पाणथळ जागा या सर्वांवर नांगर फिरवीत असतात. कधी, विकासाच्या नावाने, कधी रोजगाराच्या नावाने, कधी आरामदायी वाहतुकीसाठी, तर कधी श्रीमंतांच्या आलिशान वसाहतीसाठी. आपण आलिंगन देणारे व्हायचे की, नफेखोरीच्या कुऱ्हाडीचे दांडे..? समाज म्हणून याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आज प्रकर्षाने निर्माण झाली आहे. निसर्गाचे फटकारे मनुष्यजातीला वारंवार बसत असतानाही आपण त्यातून काही धडा घ्यायलाही तयार नाही असेच अनुभव आहेत. त्यामुळे त्या मारवाड भागातील महिलांनी जेवढे शहाणपण दाखविले तेवढेही आपण दाखवत नाही, हेच खरे दुखणे आहे.